# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ५ मार्च, २०२५

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री** : "वस्तू व सेवा कर संस्था (GSTN) यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील च

(२) **माहिती तंत्रज्ञान मंत्री** : "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) [अनुक्रमांक (१) ते (४)] –**

(१) **श्री.विक्रांत पाटील, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरीकांची पाण्याची गरज भागविताना महानगरपालिकेला अनेक अडचणी निर्माण होत असणे, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पाण्याची सद्याची मागणी प्रतिदिन २५९ द.ल.लि. प्रतिदिन असून प्रतिदिन २२४ द.ल.लि. पुरवठा होत असणे, सध्याची लोकसंख्या पहाता पनवेल महानगरपालिकेला ३५ दक्षलक्ष पाणी अपुरे पडत असणे, पनवेल महानगरपालिकेचा झपाट्याने होणारा विकास पहाता व मोठ्या प्रमाणात वाढणारे नागरीकरण लक्षात घेता भविष्यात जवळपास ८५० दक्षलक्ष प्रतिदिन पाण्याची आवश्यकता लागणार असणे, भविष्यातील पाण्याची गरज भागविण्याकरीता

अप्रकाशित प्रत

सिडकोच्या प्रस्तावित कोणत्याही धरणामध्ये पनवेल महानगरपालिकेस आरक्षण नसणे, पाण्याची गरज भागविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने कुंडलिका नदीवरील डोलवहाल बंधाऱ्यातून ५०० दक्षलक्ष प्रतिदिन पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांच्या कार्यालयामार्फत कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या कार्यालयास दिनांक २१ जानेवारी, २०२४ रोजी सादर केला असणे, पनवेल महानगरपालिकेच्या आवश्यक पाण्याची मागणी शिफारसीसह जलसंपदा विभागाने वरिष्ठ कार्यालयास सादर केली असणे, पनवेल महानगरपालिकेला पाणी पुरवठा करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास अद्यापही कोणतीच कारवाई झाली नसल्यामुळे पनवेल महानगरपालिकेला भविष्यात भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, त्यासाठी शासनाने पनवेल महानगरपालिकेला कुंडलिका नदीवरील डोलवहाल बंधाऱ्यातून ५०० दक्षलक्ष प्रतिदिन पाणी आरक्षित करण्याच्या प्रस्तावाला तातडीने मंजुर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड.अनिल परब,** डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, अरुण लाड, सुनिल शिंदे, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात विद्यमान शासनाने घाईगडबडीत सुरु केलेल्या लाडकी बहिण योजनेचे आता दोन महिने उलटूनही महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये उघडकीस येणे, विद्यमान सरकार माहे जुलै, २०२४ मध्ये सुरु केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा उडालेला बोजवारा, या योजनेकरिता राज्यात दर महिन्याला सुमारे ३६९० हजार कोटी रुपयांचा खर्च, या योजनेत सुमारे २ कोटी ६३ लाख महिलांनी नोंदणी केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, त्यापैकी २ कोटी ४१ लाख महिला पात्र ठरणे, काही महिला या योजनेच्या निकषांमध्ये बसत नसतांनाही लाभ घेत असणे, त्यामुळे या योजनेतील लाभार्थींच्या अर्जांची करण्यात येत असलेली छाननी, त्यामुळे तपासणीमध्ये बहुतांश लाभार्थी महिला अपात्र ठरणे, सदर योजनाखाली लाभार्थ्यांच्या कुटुंबियाकडे चारचाकी मोटार असणे, लाभार्थी दोन योजनांचा लाभ घेत असणे, अशा २.३ लाख महिला असणे तसेच सुमारे ६.५ लाख लाभार्थी नमो शेतकरी तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या दोन्ही योजनांचा लाभ घेत असल्याचे आढळून येणे, लाभार्थींच्या उत्पन्नाची मर्यादा

असुधारित प्रत

अडीच लाखांपेक्षा जास्त असणे, तसेच ते राज्याबाहेर राहत असल्याचे आढळून येणे, तसेच अंगणवाडी सेविकांना लाडकी बहिण योजनेचा अर्ज भरण्यासाठी शासनाने प्रत्येक अर्जामागे ५० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचे जाहिर करणे, सदर ५० रुपये प्रोत्साहन भत्ता अंगणवाडी सेविकांना अद्याप मिळालेला नसणे, घाईघाईत योजना जाहिर करुण त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, महिलांना लाडक्या बहीण योजनेतून दरमहा १,५०० रुपये देण्याचे ठरल्यानंतर लाडक्या भावांकरिता महायुती सरकारने घाईघाईत कोणत्याही अभ्यासाविना राज्यातील १० लाख बारावी, पदवी-पदविका धारक बेरोजगार तरुणांकरिता "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" जाहीर करणे, याकरिता साडेपाच हजार कोटींची भरीव तरतूद करण्यात येणे, सदर योजनेला सहा महिन्यांत योग्य तो प्रतिसाद न मिळणे, शासनाकडून महिलांना सरसकट मदत देण्याचे सोडून अनेक जाचक अटी घालण्यात येणे, महिलांची थेट शासनाकडूनच होत असलेली फसवणूक, परिणामी शासना प्रती निर्माण झालेली चिड व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या महानगराबरोबरच दुसऱ्या व तिसऱ्या स्तरातील शहरांमध्ये सुद्धा ऑनलाईन ॲपद्वारे खरेदी मोठ्या प्रमाणात वाढलेली असणे, अशा ॲपद्वारे खरेदी केलेल्या वस्तूंची डिलिव्हरी करणाऱ्या कामगारांची संख्या ही मोठी असणे, मात्र या कामगारांना कोणत्याही प्रकारचे कायदेशीर संरक्षण न देण्यात येणे, झोमॅटो, झेप्टो, स्विगी, इन्स्टामार्ट अशा अनेक ॲप मध्ये १० मिनिटात वस्तू डिलिव्हरी देण्याची स्पर्धा वाढल्यामुळे डिलिव्हरी कामगारांना १४ ते १६ तास काम करावे लागणे, या कर्मचाऱ्यांना निश्चित असा मोबदला न मिळणे, कार्यालयात बसण्यासाठी पुरेशी जागा, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृह उपलब्ध नसणे, या कर्मचाऱ्यांच्या कामांचे योग्य नियमन नसल्यामुळे प्रोत्साहनपर मोबदला (इन्सेंटिव्ह) न मिळणे, काम आणि खाजगी आयुष्यातील समतोल न उरणे, त्यामुळे अशा कामगारांना मोठ्या प्रमाणात मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असणे, देशातील राजस्थान, कर्नाटक, तेलंगणा, झारखंड व इतर राज्यांनी अशा 'गिग' वर्कर्स साठी कायदा बनवला असणे किंवा मसुदा जाहीर करून त्याबाबत सूचना मागविलेले असणे, महाराष्ट्रात ही अशा कायद्याची व 'गिग' वर्कर्सच्या संरक्षणाची तीव्र निकड निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(४) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप,** अभिजित वंजारी, राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"परभणी हिंसाचार प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूने राज्यभरात खळबळ उडणे, पोलिसांच्या अमानुष मारहाणीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला असा आरोप करण्यात येणे, मात्र पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी यांना हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात येणे, या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात न्यायालयीन समितीच्या शवविच्छेदनाचा प्राथमिक अहवाल समोर आला असणे, यामध्ये सोमनाथ सूर्यवंशी याच्या मृत्यूचे कारण shock following multiple injuries असे नमूद करण्यात आले असणे, अहवालानुसार त्यांच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा आढळून आल्या असणे, परभणी पोलिसांच्या कार्यपध्दतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित निर्माण होणे, या प्रकरणी तीन पोलिसांना निलंबित करण्यात आले असून राज्यभरात या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया उमटत असणे, पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कारवाई करावी अशी मागणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया."

(५) **सर्वश्री. मिलिंद नार्वेकर,** सुनिल शिंदे, विक्रम काळे,ॲड. अनिल परब, सर्वश्री. सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री. धीरज लिंगाडे, सत्यजीत तांबे, विक्रांत पाटील, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सध्याच्या डिजिटल युगाच्या जमान्यात सर्व बाबी ऑनलाईन करण्याकडे अनेकांचा कल असल्याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्यांच्या संख्येत सातत्याने होत असलेली मोठी वाढ, त्यामध्ये 'डिजिटल अरेस्ट' या नवीन प्रकाराची पडलेली भर, राज्यातील अनेक सुशिक्षित नागरिकांसह नामवंत व्यक्तींची डिजिटल अरेस्ट करुन मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक होणे, फिशिंग कॉल, एसएमएस लिंक, डेबिट / क्रेडिट कार्ड, एटीएम फसवणूक तसेच बक्षिसांसह विविध आमिष दाखवून गुन्हेगार राजरोसपणे राज्यातील सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक करणे, एखाद्या अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप किंवा व्हिडीओ कॉल करून समोरच्याला त्याच्याकडून न घडलेल्या गुन्ह्याची माहिती द्यायची आणि त्याच्यावर कारवाई म्हणून थेट डिजिटल अटक करायची, अशा प्रकारांत गेल्या काही दिवसांपासून होत असलेली वाढ, नागरिकांच्या पार्सलमध्ये

अग्रिम प्रत

अंमली पदार्थ असणे, शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केलेल्या कंपनीचा शेअर घोटाळ्यामध्ये सहभाग असणे, लहान मुलांशी संबंधित अश्लील चित्रफीत पाहिल्याने नागरिकांविरोधात कठोर कारवाई प्रस्तावित केली असणे, अशा प्रकारचे कॉल राज्यातील नागरिकांना करून त्यापासून बचावासाठी पैसे पाठवा किंवा तोपर्यंत काही काळ तुम्हाला 'डिजिटल अरेस्ट' करण्यात येत आहे असे सांगून भामट्यांकडून नागरिकांना बेमालूमपणे मूर्ख बनविण्यात येणे, तसेच राज्यात मागील ३ महिन्यांत १०८५ कोटी रुपयांची व मुंबईतील गोरेगांव परिसरात राहणाऱ्या ५२ वर्षीय व्यक्तीला ५२ लाख ५० हजार रुपयांची सायबर फसवणूक केल्याचेही उघडकीस येणे, नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल (एनसीसीआरपी) आणि मदत क्रमांक १९३० वर गेल्या ३ महिन्यांत प्राप्त झालेल्या ६४ हजार २०१ फसवणुकीच्या तक्रारी, परंतु, नागरिकांना योग्य प्रतिसाद न मिळणे, माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२४ या काळात २१ हजार ३६७ कोटींची सायबर फसवणूक झाल्याचा अहवाल रिझर्व्ह बँकेकडून देण्यात येणे, राज्यातील निरनिराळ्या विभागांतील सेवांवर होणारे सायबर हल्ले दीर्घकालीन परिणाम करणारे असल्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था आणि अंतर्गत सुरक्षा कमकुवत होत असल्याचे आढळून येणे, यात कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने सायबर गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण, काही प्रकरणात तर महिलांना अटक करताना त्यांची तपासणी करण्यासाठी कपडे उतरवण्यास भाग पाडण्यात येऊन त्याच व्हिडीओचा वापर करून त्यांना ब्लॅकमेल करण्यात येणे, या सर्व प्रकारामुळे राज्यातील नागरिकांत पसरलेले भीतीचे वातावरण, यास्तव राज्यात 'डिजिटल अरेस्ट' चे व सायबर गुन्हे रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत तसेच ज्यांची फसवणूक झाली त्यांचे आर्थिक नुकसान भरुन काढण्यासाठी अशा सायबर फसवणूक होणाऱ्यांच्या खात्यांना विमा संरक्षण देण्याकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६)** **ॲड.निरंजन डावखरे,** श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रसाद लाड, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यांतील घर खरेदीदारांना विकासकांकडून नुकसान भरपाईपोटी येणे असलेली २०० कोटींहून अधिक रक्कम वसूलीबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून हलगर्जी सुरू असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, यामुळे महारेराचे अध्यक्ष यांनी दिलेले आदेश कागदावर राहिले असणे, मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विकासकांची खाती गोठवण्याची कारवाई करण्याच्या दृष्टीने हालचाल करताच

विकासकांनी महारेराच्या आदेशानुसार भरपाई दिलेले असणे, ठाणे शहरात केवळ पाच विकासकांकडे १०७ कोटी रुपये अडकले असणे, ही रक्कम वसूल करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले तर ७५ टक्के रक्कम वसूल होण्याची शक्यता असणे, ठाणे जिल्ह्यात ९८ प्रकल्पांत २२२ घर -खरेदीदार तक्रारदारांचे १५५ कोटी ३२ लाख रुपये वसूल व्हायचे होते, यापैकी आतापर्यंत १५ प्रकल्पांत २७ घर खरेदीदारांचे केवळ ११ कोटी ६५ लाख रुपये वसूल झाले असणे, पालघर जिल्ह्यात ३३ प्रकल्पांकडे ७९ जणांचे २८ कोटी १९ लक्ष रुपये वसूली बाकी असणे, रायगड जिल्ह्यात ३३ प्रकल्पांतील ६५ खरेदीदारांचे ३० कोटी ९२ लक्ष रुपये प्रलंबित असणे, शासनाने उक्त प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ वसुलीबाबत कारवाई करण्याचे आदेश देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.अरुण लाड**, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात एकूण पाच पशुवैद्यकीय महाविद्यालये आणि तीन नियोजित (अकोला, जळगाव आणि अहिल्यानगर) शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालये असणे, तसेच माफसू अंतर्गत असलेल्या पाच पशुवैद्यकीय महाविद्यालयांतून अनेक प्राध्यापकांच्या जागा रिक्त असणे, या महाविद्यालयांमध्ये अतिरिक्त कार्यभारावर सर्व कारभार सुरू असणे, नियोजित पशुवैद्यकीय महाविद्यालये सुरू न करता नव्या खासगी पशुवैद्यकीय महाविद्यालयांचा घाट सरकारने घातलेला असणे, अशा परिस्थितीत माहे जुलै, २०२४ मध्ये महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी राज्यात सहा खाजगी पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत अधिसूचना जारी केली असणे, राज्य सरकारने व्यावसायिक शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी खाजगी संस्थांना परवानगी दिली असणे, "नॅसकॉम" सारख्या संस्थांच्या अहवालानुसार अशा खाजगी संस्थांमधून बाहेर पडणारे जे पदवीधर आहेत त्यांपैकी फक्त २५ टक्के हे नोकरीस पात्र असणे, भविष्यात खाजगी महाविद्यालये भरमसाठ फी आकारणार, त्यात डोनेशनसारखे प्रकार सुरू होऊन गरजू आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असल्याने राज्यातील पशुवैद्यक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये याबाबतीत प्रचंड असंतोष निर्माण झालेला असणे, राज्यात सुरू असलेल्या खाजगी इंजिनिअरिंग, वैद्यकीय आणि कृषी महाविद्यालयांची परिस्थिती आणि त्यामधून निर्माण झालेले प्रश्न पाहता खासगी पशुवैद्यकीय महाविद्यालयांबाबतच्या निर्णयाचा शासनाने फेरविचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित

**(८)** **सर्वश्री प्रसाद लाड,** विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील मुंबई, ठाणे, बेलापूर, उलवे, तळोजा येथील खाड्यांमध्ये औद्योगिक वस्त्यांमधून येणारे सांडपाणी, डंम्पिंग ग्राऊंड मुळे पाणी दुषित होऊन वाढत्या प्रदुषणाचा फटका मासेमारी व्यवसाय व स्थानिक मच्छिमारांना होत असल्याची बाब दिनांक २५ जानेवारी, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, स्थानिक मच्छीमार बांधवांनी ठाणे खाडी आणि उपखाड्यांमध्ये ६०० मी. लांबीच्या जाळीच्या सहाय्याने मासेमारी केली असता दोन दिवसांच्या प्रयत्नानंतर त्यांच्या हाती दोन बोटींमधुन केवळ १५ ते २० किलो मासे मिळाले असुन, यातील ६० टक्के मासे खाण्यायोग्य नसून या भागांमध्ये मिळणारे जिताडा, माकोळ, मोठी कोळंबी, शेवंड या सारखे मासे नामशेष झाले असल्याची गंभीर बाबही निदर्शनास येणे, खाड्यांमधील प्रदुषणाचे वाढते प्रमाण लक्षात घेता मच्छिमारांनी अलीकडेच केलेल्या सर्वेक्षणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण विभाग यांच्याकडे तक्रारी केल्या असणे, मुंबईसह उपनगरातील खाडी परिसरात सांडपाणी सोडणाऱ्या औद्योगिक वसाहतींवर शासनाने करावयाची कारवाई, त्याचबरोबर मुंबईसह उपनगरातील खाडी परिसरात पारंपारिक मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांसाठी शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (शेवटचा दिवस)**

**सात : (मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** ) ---

**सर्वश्री प्रविण दरेकर**, विक्रम काळे, हेमंत पाटील, सदाशिव खोत, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री परिणय फुके, शिवाजीराव गर्जे, सतिश चव्हाण, प्रसाद लाड, पंकज भुजबळ, श्रीकांत भारतीय, श्रीमती भावना गवळी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, वसंत खंडेलवाल, किशोर दराडे, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, ज्ञानेश्वर म्हात्रे,

असुधारित प्रत

अमरीशभाई पटेल, राजहंस सिंह, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतक-यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेवून आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबवून पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)" प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतकऱ्यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतकऱ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची

आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतकऱ्यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सुत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतक-यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत ॲप' हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजु महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग

मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्याच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री जयंत आसगावकर,** अशोक जगताप, अभिजित वंजारी, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"दिनांक २८ मे २०१० रोजीच्या शासन परिपत्रकानुसार स्वयंअर्थसहाय्य तत्त्वावर " मान्यता प्राप्त वर्ग इयत्ता ६ वी ते १२ वी दर्जावाढ व वर्ग इयत्ता १ ली ते १२ वीच्या नविन मंजुरीसाठी लागणारे ३० वर्षांचे नोंदणीकृत करार (रजिस्टर्ड अँग्रीमेंट) अट शिथिल करण्यात येणे व डिपॉजिट रुपये १५ लाख व चलन रुपये १,५०,०००/- हे शिथिल करण्यात येणे, शासनाने सन २०१० ते २०१९ पर्यंत असलेले रुपये ५००० चलन व ५ वर्षांचे ॲग्रीमेंट व डिपॉजिट रुपये ५ लाख हे नियमच पुन्हा लागू करणे, व इरादापत्र न देता मंजुरी देण्यात येणे, राज्यातील इतर अनेक शाळांना इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत मंजुरी असून त्यांना इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत दर्जावाढ मिळाली नसणे तसेच इयत्ता १ ली ते १२ वी साठी मंजुरी मिळण्याकरिता प्रस्ताव शासनाच्या कार्यालयात प्रलंबित असून दर्जावाढ देण्यात आलेली नसणे, वरील अटी संस्थाचालक पूर्ण करू शकत नाही म्हणून वरील विषयावर तातडीने निर्णय घेऊन मंजुरी देण्यांत येणे, राज्यात अशा ६ ते ७ हजार शाळा असून गरीब मुलांना लाभ देण्यास व शासनावरील भार कमी करण्यास मदत होईल याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री जगन्नाथ अभ्यंकर,** किशोर दराडे, ज्ञानेश्वर म्हात्रे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"शासनाने दिनांक २ मे, २०२२ पासून अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मंजूर रिक्त पदे व अल्पसंख्यांक संस्थांमधील रिक्त

जागा भरण्याबाबत बंदी घातली असणे, दिनांक २० जून, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्तीवरील बंदी तात्पुरत्या कालावधीकरीता उठविण्यात आली असणे, अल्पसंख्यांक संस्थावर घातलेली बंदी दिनांक १३ जुलै, २०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये उठविण्यात आली असणे, आणि दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन आदेशान्वये रिक्त पदे भरण्याबाबत पुन्हा बंदी घालण्यात आल्याने अनुदानित शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजारो पदे रिक्त राहिल्यामुळे उच्च शिक्षित पात्र उमेदवार नोकरीपासून वंचित राहिले असून हजारो पात्र उमेदवारांची १० ते ११ वर्षे वाया गेली असणे, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार बिगर अल्पसंख्यांक संस्थेच्या अनुदानित शाळांतील रिक्त जागा पोर्टलद्वारे भरण्याचे शासनाने आदेश दिले असून सदर आदेशामध्ये वयोमर्यादेची अट घालण्यात आली असणे, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ९ (४) मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतांना उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी १८ वर्षापेक्षा कमी असता कामा नये एवढाच उल्लेख असणे, कमाल वयोमर्यादा सदर नियमावलीमध्ये नमूद केलेली नसणे, नियमावलीतील सदर तरतूदी दुर्लक्षुन दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये कमाल वयोमर्यादा दर्शविण्यात यावी तसेच मागील १०-११ वर्षे मंजूर रिक्त जागांवरील भरती थांबविल्यामुळे उमेदवारांचे वय वाढल्यामुळे शिक्षकांची नोकरी मिळण्यापासून ते वंचित राहिले असणे, विद्यार्थ्यांनी डी.एड अथवा बी.एड च्या प्रशिक्षण अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला असूनही १० वर्षांपूर्वी डी.एड, बी.एड ही अध्यापन शास्त्रातील अर्हता प्राप्त केलेल्या पुर्ण पात्रताधारी युवक- युवतींनी वयाची मर्यादा ओलांडल्यामुळे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील वयाच्या अटीमुळे भविष्यात शिक्षक पदावर नोकरी न मिळाल्यामुळे त्यांना चरितार्थासाठी अन्य व्यवसाय शोधावा लागणे, मागील १०-११ वर्षे शिक्षकांची रिक्त पदे भरण्यावर घालण्यात आलेली अनाकलनीय बंदी आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी, सेवाशर्ती, नियमावली, १९८१ मधील नियम ९ (४) मधील तरतूद यांचा साकल्याने विचार करून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : ४ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद